# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
# कोकण परिमंडळ कार्यालय
# ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

**ग्राहक तक्रार क्र. १०६/२०११ दि.१७.१०.२०११**

| | |
|---|---|
| **डॉ.गजानन दत्तात्रय वेल्हाळ<br>मु.पो.देवरुख,<br>ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी.** | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **कार्यकारी अभियंता 'महावितरण'<br>स व सु विभाग रत्नागिरी .** | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | **१) श्री. डी. एस्. जामखेडकर, अध्यक्ष<br>२) श्री. व्ही.बी.जगताप ,सचिव/कार्यकारी अभियंता<br>३) श्री.एन्.ए.कुलकर्णी , सदस्य** |
| **ग्राहकाच्या वतीने** | **१. डॉ.गजानन दत्तात्रय वेल्हाळ (ग्राहक)<br>२. जयंत पु.बिवलकर (प्रतिनिधी)** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | **श्री.अनिल वा. महाजन (कार्यकारी अभियंता)<br>विभागीय कार्यालय रत्नागिरी<br>श्री.अ.अ.कागी (उपकार्यकारी अभियंता)<br>विभागीय कार्यालय रत्नागिरी<br>श्री. ए.एस.नवले (कनिष्ठ अभियंता)<br>विभागीय कार्यालय रत्नागिरी** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडस्मन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

तक्रारदार ग्राहक डॉ.गजानन दत्तात्रय वेल्हाळ, मु.पो.देवरुख यांच्या घरगुती वापरासाठी वीज जोडणी देण्याबाबत तक्रार उद्‌भवल्याने, तसेच अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष रत्नागिरी कडून समाधानकारक कार्यवाही न झाल्याने आयोगाच्या नियमावलीनुसार अनुसुची 'अ' मध्ये आवश्यक त्या तपशिलासह आणि संबंधित कागदपत्रासह तक्रार दि.१७.१०.२०११ रोजी दाखल झालेली आहे. तक्रार प्राप्त होताच मंचाकडील पत्र क्र.१०६४, दि.१८.१०.२०११ च्या पत्रानुसार कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय रत्नागिरी यांच्याकडून म्हणणे / स्पष्टीकरण मागण्यात आले असता, संबंधित विभागीय कार्यालयाकडून पत्र क्र.६७३५, दि.२४.११.२०११ च्या पत्रानुसार आवश्यक त्या कागदपत्रासह स्पष्टीकरण दि.२४.११.२०११ रोजी दाखल करण्यात आले. आयोगाच्या नियमावलीनुसार उभय बाजुना नोटीस काढण्यात येवून तक्रार प्रकरणाची सुनावणी दि.२९.११.२०११ रोजी घेण्यात आली असता उभय बाजुनी उपस्थित राहून युक्तीवाद करण्यात आला.

तक्रारदार ग्राहकाचे म्हणणे असे की, दि.२०.०५.२०११ रोजी देवरुख ग्रामपंचायत हद्दीतील घर क्र.३/६२७(१) सदनिकेसाठी घरगुती वापराकरिता वीजजोडणी करीता अर्ज करण्यात आला असता देवरुख कार्यालयाने दि.१७.०६.२०११ रोजी पत्र क्र.११५१ नुसार जोडणीस नकार दिला. कारण या अर्जासोबत आणखीन सहा स्वतंत्र जोडण्याकरिता अर्ज दाखल करण्यात आला होता. वीजजोडणी नाकारण्यामागची कारणे अवैध आणि न्यायतत्वाच्या विरुद्ध असल्याने दि.०४.०७.२०११ रोजी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, रत्नागिरी यांच्याकडे विहीत नमुन्यात तक्रार दाखल केली असता कक्षाकडून सात स्वतंत्र जोडण्या ३० दिवसात देवून वीजपुरवठा सुरु करण्याचा आदेश प्राप्त झाल्याने दि.१५.०९.२०११ रोजी वीज पुरवठा सुरु करण्यात आला. कक्षाच्या आदेशावरुन ही बाब सिद्ध झाली की, अर्ज नाकारण्याची कृती पुर्णपणे चुकीची आणि कायद्यातील तरतुदी आणि आयोगाच्या नियमावलीशी विसंगत होती. माझ्याकडून कोणत्याही नियमनांचा भंग झाला नसल्याने, तसेच कोणत्याही तांत्रिक बाबींचा अडथळा नसताना अर्ज केल्यापासून प्रत्येक टप्प्यावर विहीत कालावधीच्या मर्यादेचे उल्लंघन झालेले आहे. विनिमयातील तरतुदीनुसार नमुद केलेल्या कालावधीनंतर प्रत्येक टप्प्यावरील विलंबाकरिता भरपाई मिळण्यास मी पात्र असून, वीज पुरवठा सुरु करण्याबाबत तसेच जोडणी देण्याबाबत १३ आठवडयाहून अधिक कालावधीचा विलंब झाला असल्याने, नियामक आयोगाच्या कृती मानकाविषयी विनिमय २००५ च्या कलम १२ परिशिष्ट 'अ' मधील तरतुदी नुसार एकूण भरपाईपोटी रु.२६००/- देण्यात यावेत. तक्रार प्रकरणात ज्या पद्धतीने मनस्ताप सहन करावा लागला, तसेच कर्मचा-यांची वर्तणूक तसेच झालेल्या एकूण खर्चापोटी रु.५०००/- ची भरपाई देण्यात यावी. संबंधित सहाय्यक अभियंत्यावर दंडात्मक कार्यवाही किंवा तत्सम आदेश देण्यात यावा.

तक्रार प्रकरणाच्या सुनावणीस दि.२९.११.२०११ रोजी उभयबाजुंनी उपस्थित राहून युक्तीवाद करण्यात आला. स्वतः ग्राहक आणि त्यांच्या प्रतिनिधींनी आपल्या युक्तीवादात स्पष्ट केले की, सदनिकांचे बांधकाम चालू असताना तात्पुरते कनेक्शन मागण्यात येवून ते कायमस्वरुपी करण्यात आले आणि त्यानंतर ७ स्वतंत्र सदनिकांकरीता ७ स्वतंत्र वीजजोडण्या मागण्यात आल्या, की ज्या करिता कागदपत्राची योग्य आणि आवश्यक ती पुर्तताही करण्यात आली. अर्जात कोणत्याही त्रुटी नसताना दि.१७.०६.२०११ रोजी सदरहू वीज जोडण्या नाकारण्यात आल्या आणि पुर्वग्रह कलुषीत पद्धतीने आरोप करण्यात आले. अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाने आदेश दिल्यानंतरच वीजजोडण्या देवून वीजपुरवठा देण्यात आला. या सर्व प्रक्रियेत संबंधित जोडणीचे कोटेशन, अन्य बाबीचा पुर्तता आणि प्रत्यक्ष वीजपुरवठा यामध्ये १३ आठवडयाचा विलंब झाला असल्याने

आयोगाच्या नियमावलीनुसार भरपाई देण्यात यावी. कार्यालयीन कर्मचारी तसेच सहाय्यक अभियंता यांची मनमानी आक्षेपार्ह विधाने आणि जाणूनबुजून त्रास देण्याच्या प्रवृत्तीने मला शारिरिक, मानसिक त्रासास आणि अनावश्यक खर्चास सामोरे जावे लागले त्याचीही भरपाई मिळावी आणि संबंधितांनवर कारवाईचे आदेश देण्यात यावेत. महावितरणच्यावतीने त्यांच्या प्रतिनिधींनी आपल्या युक्तीवादात प्रतिपादन करताना देवरुख कार्यालयाशी दि.२१.०१.२०११ पासून २३.०९.२०११ पर्यंतचा प्रत्येक टप्प्यांतील पत्रव्यवहाराचा उल्लेख करुन स्पष्ट केले की, ग्राहकाकडे असलेल्या घरगुती थ्री फेज (ग्राहक क्र.२२३०३००२५७४१) या वीज जोडणीवरील भार ५ KW वरुन १४.८ KW असा वाढवून मिळण्याकरिता अर्ज दिला होता आणि उच्चदाब वाहीनीचे पोल व रोहीत्र उभारण्यास संम्मतीपत्रही दि.०१.०३.२०११ रोजी दिले होते. तथापी वाढीव वीजजोडणीचा भार रद्द करुन नवीन ७ सदनिकासाठी एकाच नावाने एकाच सवर्गात वीज जोडणी मिळण्यासाठी दि.२०.०५.२०११ रोजी स्वतंत्र अर्ज दाखल केले. या अर्जाबाबत कनिष्ठ अभियंता, देवरुख यांनी रोहीत्र क्र.४१८९३८६ हा अतिभारीत असल्याचे दि.२५.०५.२०११ रोजी कळविले होते. जुने रोहीत्र अतिभारीत असल्यामुळे नव्या रोहीत्राकरिता प्रस्ताव दि.०८.०७.२०११ अन्वये मंजुरीसाठी पाठवण्यात आला. ग्राहकाने माहीतीच्या अधिकाराखाली दोन्ही रोहीत्रावरील भारमान तसेच सर्व ग्राहकांची यादी मागतली असता दि.०२.०९.२०११ पत्रानुसार देण्यात आले. कंपनीच्या धोरणात्मक बाबीनुसार पत्र क्र.११५१, दि.१७.०६.२०११ च्या पत्रानुसार उपविभागीय कार्यालयाने ग्राहकाने मागणी केलेल्या ठिकाणी नविन रोहीत्र व उच्चदाब वाहीनी लागणार असल्याचे तसेच ग्राहकास एकाच नावे एकाच इमारतीत वीजपुरवठा देता येत नसल्याचे कळविले. ग्राहकाने अंतर्गत कक्षाकडे तक्रार केली असता, अंतर्गत ग्राहक कक्षाच्या आदेशानुसार सर्व वीजजोडण्या दि.१५.०९.२०११ रोजी देण्यात आल्या. ग्राहकाच्या वीजजोडणी नुसार नविन रोहीत्र/उपकेंद्रे सुरु करण्याची आवश्यकता असल्यास एका वर्षाची मुदत आयोगाच्या नियमावलीनुसार दिलेली आहे आणि ही बाब ग्राहकाला दि.१७.०६.२०११ च्या पत्रानुसार कळविण्यात आलेली आहे. रोहीत्राचीच आवश्यकता असल्याने आयोगाच्या कृतीमानकानुसार वरिल कामासाठी एका वर्षाचा कालावधी आहे आणि या कालावधीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून विद्युत जोडणी देण्यात आलेली आहे. त्यामुळेच नियमावलीचा भंग झाला नसून कोणतीही दिरंगाई करण्यात आलेली नाही. प्रकरणाची ही वस्तुस्थिती लक्षात घेता ग्राहकाला नुकसान भरपाई नाकारण्यात यावी आणि अर्ज निकाली काढण्यात यावा अशीही मागणी महावितरणकडून करण्यात आली.

सुनावणी कालावधीत उभयबाजुनी जे मुद्दे उपस्थित करण्यात आले, त्यानुसार तपशिल मागविला असता १० डिसेंबर पर्यंतची मुदत तपशिल दाखल करण्याकरिता उभय बाजुंना देण्यात आली. या दिलेल्या मुदतीनुसार ग्राहकाने आपला तपशिल दि.१२.१२.२०११ रोजी दाखल केला. तथापी महावितरणकडून पुढील कोणताही खुलासा किंवा तपशिल उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. तसेच पुढील मुदतवाढीचा किंवा तपशिलाबाबत कोणताही संपर्क झालेला नाही.

तक्रार प्रकरणातील दाखल करण्यात आलेला तपशिल, उभयबाजुनी केलेला युक्तीवाद व संबंधित बाजुनी दाखल केलेली वेगवेगळी माहीती विचारात घेता नविन वीजजोडणी बाबत महावितरणकडून करण्यात आलेली कृती किंवा जी कारणे देण्यात आली ती वस्तुस्थितीशी विसगंत असून ग्राहकाची पुर्णपणे दिशाभूल करणारी ठरलेली आहेत. कंपनीच्या धेयधोरणाचा किंवा अन्य बाबींचा वीज जोडण्याबाबत कसलाही संबंध नसताना ग्राहकावर केलेले आरोप खोडसाळपणाचे असून, एकूणच नियमावलीचा विपर्यास्त करणारे आहे असे मंचाचे स्पष्ट मत असून तपशिलाचा विचार करता हेतुपुरस्कर ग्राहकाला कोणत्यातरी कारणाने जाणूनबुजून त्रास देण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट झाले आहे. ग्राहकाने माहीती अधिकारात तपशिल उपलब्ध करुन दिल्यानंतर तसेच अंतर्गत

कक्षाकडे धाव घेतल्यानंतर एकाच दिवशी, एकाच वेळेस, एकाच रोहीत्रावरुन सर्व जोडण्या देण्यात आलेल्या आहेत, ही एकमेव बाब कर्मचारी वर्तणूक आणि महावितरणच्या सद्याच्या प्रशासन पद्धतीवर भाष्य करण्यास पुरेशी असून कायद्यातील तरतुदी स्पष्ट असतानाही त्याचा आपल्या सोयीकरिता वापर केल्याचे उघड झाले आहे. महावितरणकडून पत्र क्र.७३८९ , दि.२२.१२.२०११ च्या पत्रानुसार जी माहीती आणि खुलासा देण्यात आला आहे तो वस्तुस्थितीशी सुसंगत नाही. रोहीत्राच्या नियोजीत उभारणीमुळे वीजजोडण्या देता येत नव्हत्या हे कोठेही अधोरेखित झालेले नाही किंबहुना अंतर्गत कक्षाकडे माहिती देताना ही बाब नमुद करण्यात आलेली नसून अंतर्गत कक्षाच्या आदेशानुसार अतिरिक्त भार असलेल्या रोहित्रावरुनच सदरहू वीजजोडण्या देण्यात आलेल्या आहेत. ग्राहकाच्या सात वेगवेगळया वीजजोडणीसाठीचा अर्ज दि.२०.०५.२०११ रोजी दाखल झालेला आहे. ग्राहकाकडून घेण्यात आलेली दि.०१.०३.२०११ ची समंती ही केवळ वीजपुरवठा करताना लागणारे पोल ग्राहकाच्या जागेतून जाणार असल्याने पोल टाकण्याची संम्मती ग्राहकाने दिली असून, रोहित्र उभारणी बाबतचा याच्याशी कोणताही संबंध येत नाही. देवरुख कार्यालयाचे दि.२५.०५.२०११ चे पत्रातून रोहीत्राची संम्मती चुकीची असून ग्राहकाने पोलबाबत संम्मती दिलेली आहे. ग्राहकाने विद्युत भारवाढीचा अर्ज रद्द करुन सात नवीन वीजजोडण्या मागितल्याने रोहित्र क्र.४१८९३८६ हा अतिरिक्त भाराचा ठरल्याने तसेच अर्जदाराच्या नावे एकाच जागेत अनेक वीजजोडण्या देता येत नाहीत किंबहुना शहरातील मुख्य बाजारपेठेत सात सदनिकामध्ये वीजेचा वापर कोणत्या कारणाकरीता होणार आहे इ. मुद्दे वीज विधेयक २००३ मधील तरतुदी आणि आयोगाच्या नियमावली स्पष्ट भंग करणारे आहेत. वीज विधेयक २००३ मधील कलम ४३ नुसार कोणत्या परिस्थितीत वर्षाचा कालावधी लागू शकतो याचा स्पष्ट उल्लेख आहे. ग्राहकाला देण्यात आलेला नकार हा केवळ नियोजीत रोहित्राच्या एकाच कारणाकरिता नसून त्यामध्ये अन्य कारणाचाही उल्लेख आलेला आहे आणि म्हणूनच जो जाणूनबुजून आणि हेतुपुरस्कर झालेला आहे हे ग्राहकाचे म्हणणे रास्त असून शेवटचा पर्याय या नात्याने माहिती अधिकारात ही बाब अधिक स्पष्ट झालेली दिसते आहे. कलम ४३ च्या तरतुदीनुसार "This clause provides for supply of electricity to be given to the owner or occupier of premises by a distribution licensee within one months, or within six months where such supply requires extension of distribution mains, commissioning of new sub - station. If a distribution licensee fails to supply electricity within the period specified above, he shall be liable for a penalty which may extend to one thousand rupees for each day of default." अपवादात्मक स्थितीत कलम ४४ नुसार वीजपुरवठा करण्याच्या कर्तव्यातून अपवाद नमुद केला असून, काही नैसर्गिक आप्पंतीमुळे किंवा त्यांच्या नियत्रणात नसलेल्या गोष्टीमुळे वीजपुरवठा करता आला नाही तरच सवलत असू शकते अन्यथा नाही. दाखल करण्यात आलेल्या तपशिलावरुन दि.२१.०१.२०११ नंतर ज्या जोडण्या देण्यात आलेल्या आहेत त्याचा तपशिल महत्वाचा असून तो खालीलप्रमाणे

| अ.क्र. | ग्राहक क्रं. | मंजूर भार | पुरवठयाची तारीख |
|---|---|---|---|
| १ | २२३०३००१५८१८ | ०.४४ | १९.०३.२०११ |
| २ | २२३०३००१४८११ | २.७६ | ०९.०३.२०११ |
| ३ | २२३०३००१५०६१ | ४.०४ | ०९.०३.२०११ |
| ४ | २२३०३००१७९८५ | २.८४ | २८.०५.२०११ |
| ५ | २२३०३००२३५८७ | १.०६ | १४.०७.२०११ |

वरिल तपशील पहाता, महावितरणने कशा पद्धतीने कृती केली यावर स्पष्ट प्रकाश टाकणारी असून ग्राहकाने दि.२०.०५.२०११ रोजी केलेल्या अर्जानंतरही त्याच रोहीत्रावरुन दि.२८.०५.२०११ आणि १४.०७.२०११ रोजी जोडण्या देण्यात आलेल्या आहेत. उपलब्ध रोहीत्रावरुन योग्य भार व्यवस्थापन करुन ग्राहकाच्या मागणीनुसार वीजपुरवठा करता येणे शक्य असतानाही, तो देण्यात आलेला नाही. महावितरणकडून अशक्यप्राय अशा कोणत्याही तांत्रिक बाबी नमुद केल्या नसून केवळ ग्राहकाला सतावण्याच्या उद्देशानेच त्याला त्रास दिल्याचे एकूणच घटनाक्रमानुसार अधोरेखित झालेले आहे आणि याकरिता देवरुख कार्यालयाला जबाबदार ठरणे अधिक उचीत ठरणारे आहे. ग्राहकाने अर्ज केल्यापासून म्हणजेच दि.२०.०५.२०११ पासून वीजजोडणीची प्रक्रिया दि.१५.०९.२०११ पर्यंत पुर्ण केलेली असून पुरवठा कार्यान्वीत करण्यात आलेला आहे.

वीज विधेयक कायद्यातील कलम ५१, कलम ५८ मधील तरतुदी नुसार ग्राहकाला सर्व्हिस देण्याबाबत मापदंड निश्चित करण्यात आले असून याबाबतचे महावितरणचे स्पष्टीकरण संमर्थनीय नसून ते सिद्ध करण्यातही महावितरणला अपयश आलेले आहे. ग्राहकाची मागणी केवळ भरपाईची नसून वीज जोडणीच्या निमित्ताने संबंधित कार्यालयाकडून ज्या पद्धतीने हाताळणी करण्यात आली त्या उद्रेकापोटी झालेला संताप असून अश्या संतापाची दखल महावितरणने वेळीच घेऊन उचीत कारवाई करावी, असाच मंचाचा आग्रह असून याबाबतची मुभा महावितरणला देण्यात आलेली आहे. तक्रार प्रकरणातील वस्तुस्थिती, झालेला विलंब विचारात घेता आयोगाच्या नियमावलीतील स्टॅण्डर्ड ऑफ परफॉरमन्स् आणि भरपाईच्या तरतुदीनुसार नियम क्र.४ आणि नियम क्र.१२ नुसार अपवादात्मक परिस्थिती विचारात घेतली तरी सुद्धा ग्राहक भरपाईस पात्र असून अश्या भरपाईची रक्कम रु.१२००/- अधिक या अनुषंगाने झालेली ग्राहकाची छळवणूक व खर्च इ.बद्दल रु.५००/- देणे योग्य ठरणारे आहे. महावितरण आपल्या अधिकारात संबंधित भरपाईची वसुली जबाबदार कर्मचा-याकडूनही करु शकते आणि तो अधिकार महावितरणने वापरलाच पाहीजे. तक्रार प्रकरणातील महावितरणकडून उपस्थित करण्यात आलेले निरर्थक आक्षेप, हरकती आणि ग्राहकावरील आरोप फेटाळण्यात येत आहेत.

मंचाच्या वर निर्देष केलेल्या निष्कर्शानुसार खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत असून, त्याची कार्यवाही विहीत कालावधीत करणे महावितरणवर बंधनकारक राहील.

# **आदेश**

१. ग्राहकाच्या तक्रारीनुसार कृतीमानकाच्या अपयशाबद्दल भरपाई अशंतः मान्य करण्यात आली असून भरपाईपोटी ग्राहकाला रु.१२००/- (रु.बाराशे मात्र) हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात देण्यात यावेत. विलंब झाल्यास, विलंबाच्या प्रत्येक दिवसागणी रु.१००/- (रु.शंभर मात्र) प्रमाणे भरपाई देण्यात यावी.
२. तक्रार प्रकरणातील अनुषंगिक बाबी आणि झालेल्या खर्चाबद्दल ग्राहकाला रु.५००/- (रु.पाचशे मात्र) १५ दिवसात देण्यात यावेत. संबंधित रकमेचे बिलातून समायोजन करण्यात येवू नये.
३. वरिल आदेशाची कार्यवाही विहीत कालावधीत करुन पुर्तता अहवाल मंचाकडे आदेश मिळाल्यापासून २१ दिवसात दाखल करावा.

४. या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.

**पत्ता :-**

**सचिव,**
**लोकपाल महाराष्ट्र राज्य विदयुत नियामक आयोग**
**६०६/६०८, केशवा बिल्डींग,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१.**
**फोन नं. ०२२ / २६५९२९६५**

| | |
|---|---|
| **डी. एस्. जामखेडकर** | **एन्.ए.कुलकर्णी** |
| **अध्यक्ष** | **सदस्य** |
| **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** | **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** |

**दिनांक :- २८.१२.२०११**
**ठिकाण :- रत्नागिरी.**

मी, श्री.वसंत बापू जगताप , कार्यकारी अभियंता तथा सचिव या नात्याने नमुद करतो की, ग्राहक तक्रार निवारण मंच, रत्नागिरी येथिल तक्रार क्र.**१०६/२०११** या बाबतीत मंचाने दिलेल्या आदेशातील, आदेश क्र.१ व २ याबाबत मी सहमत नाही. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( वितरण परवानाधारकांच्या कृती मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाई निश्चितीकरण ) विनिमय २००५ मधील कलम ४ मध्ये ग्राहकाने वीज पुरवठा मिळणेसाठी अर्ज केल्यानंतर कनेक्शन देण्यासाठीचा कालावधी विस्तृतपणे नमुद केलेला आहे. कलम ४.६ मध्ये नविन कनेक्शन देण्यासाठी जर उपकेंद्र सुरु करावे लागणार असेल तर असे कनेक्शन देण्यासाठीचा कालवधी एक वर्षासाठीचा ग्राहय मानलेला आहे.

प्रस्तृत प्रकरणामध्ये आपले वीज कनेक्शन मिळणेसाठी दि.२०.०५.२०११ रोजी अर्ज केलेला आहे व हे कनेक्शन ज्या रोहीत्रावरुन द्यावयाचे आहे त्या रोहीत्रावरील भार लक्षात घेता श्री.वेल्हाळ यांचे कनेक्शन त्याच रोहीत्रावरुन देता येणे शक्य नव्हते व त्याची कल्पना अर्जदाराला वेळीच दिलेली आहे. सदर रोहीत्र हे देवरुख येथिल तहसिलदार कार्यालयाजवळ १०० केव्हीए चे रोहीत्र असून, त्याची १३४ ॲम्पीअर इतकी भाराची क्षमता आहे. दि.३१.०५.२०११ रोजी त्या रोहीत्रावरील भार मोजला असता तो १५० ॲम्पीअर इतका आढळलेला आहे. तसेच दि.२१.१२.२०११ रोजी मोजलेला भार १८० ॲम्पीअर इतका नोंदविलेला आहे. सबब सदर रोहीत्र अती भारीत असून श्री.वेल्हाळ यांचे कनेक्शन त्याच रोहीत्रावरुन देणे तांत्रिक दृष्टया शक्य नव्हते व त्यामुळे तेथे नविन रोहीत्र बसविणे क्रमप्राप्त होते.

ग्राहकाचा अर्ज मिळालेपासून ते कनेक्शन दिल्याचा कालावधी लक्षात घेतले असता, हे कनेक्शन अर्ज मिळालेपासून एका वर्षाच्या आत दिलेले आहे व हा कालावधी महाराष्ट्र वीज नियामक आयोग कृती मानके अधिनियम २००५ मधील कलम ४.६ मध्ये दिलेल्या कालावधी मध्ये ग्राहय मानलेला आहे, असे असताना महावितरणला कृती मानकांच्या अपयशाबद्दल दंड लावणे उचित होणार नाही. तसेच झालेल्या खर्चा बद्दल अर्जदाराने कोणताही सकृत दर्शनी पुरावा सादर केलेला नसल्यामुळे अर्जदारास खर्चाची भरपाई देणे देखिल संयुक्तीक होणार नाही.

**वसंत बापू जगताप**
**कार्यकारी अभियंता तथा सचिव**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- २८.१२.२०११**
**ठिकाण :- रत्नागिरी.**